४. मनुमत्स्यकथा
शतपथब्राह्मण १.८.१.१-६

प्रस्तावना -

शतपथ ब्राह्मण हे शुक्ल यजुर्वेदाचे ब्राह्मण असून काण्व आणि माध्यन्दिन अशा दोन्ही शाखांमध्ये उपलब्ध आहे. यात शंभर अध्याय असल्यामुळे याला शतपथ म्हणतात. हे शंभर अध्याय १४ काण्डांमध्ये विभागले आहेत. चौदावे काण्ड आरण्यक काण्ड म्हणून प्रसिद्ध असून त्यातला शेवटचा भाग म्हणजेच ''बृहदारण्यकोपनिषद्'' होय.

शाण्डिल्य आणि याज्ञवल्क्य या दोन ऋर्षीचे यात प्रामुख्याने योगदान आहे. शाण्डिल्य ऋर्षीची मते मुख्यतः ६-१० काण्डामध्ये मांडलेली असून वेदीची रचना इ. यज्ञीय कर्माशी संबंधित आहेत. हा भाग कदाचित् सप्तसिंधुप्रदेशात रचलेला दिसतो त्यामुळे प्राचीन असावा.

याउलट याज्ञवल्क्यांनी रचलेला बराचसा भाग पूर्वेकडील प्रदेशातला असून तुलनेने अर्वाचीन असावा. कुरु, पांचाल, कोसल, विदेह, सृंजय इ. प्रांतातील लोकांचा उल्लेख येत असल्यामुळे वैदिक संस्कृतीचे केन्द्र सप्तसिंधुप्रदेशातून पूर्वभागात सरकलेले दिसते.

महाभारतातल्या अनेक कथांचे सार शतपथात आलेले दिसते. कद्रु-सुपर्ण यांचे युद्ध, पुरूरवस्-उर्वशी, सुकन्या-च्यवन. इ कथा महत्त्वाच्या आहेत. मनु-मत्स्यकथा ही देखील तशाच प्रकारची कथा आहे.

प्रस्तुत ब्राह्मण यजुर्वेदाचे असल्यामुळे अध्वर्यूंची कामे यात सांगितलेली आहेत. 'इडा' नावाच्या द्रव्याची महती सांगण्यासाठी प्रस्तुत कथा येते. महाभयंकर प्रलयातून माशाच्या मदतीने मनू वाचला. त्याने यज्ञ केला. त्या यज्ञातून 'इडा' नावाची स्त्री निर्माण झाली. मनु आणि इडा यांच्याद्वारे जगात मानवी सृष्टी निर्माण झाली. म्हणून जो इडेची आहुती

देतो त्याचा वंश कधीही नष्ट होत नाही. हे सांगण्यासाठी प्रस्तुत कथा येते. सायणाचार्य या उताऱ्याला 'इडाब्राह्मण' असे म्हणतात.

अत्यंत प्राचीन वैदिक प्रलय कथा म्हणून ही कथा महत्त्वाची ठरते. प्राचीन संस्कृतींचा अभ्यास करतांना प्रलयकथांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. काही अपवाद वगळता अनेक प्राचीन संस्कृतीमध्ये प्रलयकथा सापडतात.

मनु-मत्स्य कथेचा अपवाद वगळता इतर सर्व देशांच्या कथांमध्ये देवतेच्या कोपामुळे प्रलय येतो, फक्त सदाचारी व्यक्तीला पूर्वसूचना मिळते आणि तो वाचतो असे चित्रण आढळते. भारतीय संस्कृतीमध्ये मात्र कर्म संकल्पना अनुस्यूत असल्यामुळे प्रलय देवतेच्या कोपामुळे आलेला दिसत नाही.

प्रलय कथा निर्माण होण्यामागे अनेक कारणे नमूद करण्यात येतात. प्राचीन मानवाने विध्वंसक प्रलयाचा अनुभव घेतला असेल आणि त्या प्रलयांच्या स्मृती प्रलयकथांच्या रूपातून व्यक्त झाल्या असतील. काही विद्वानांच्या मतानुसार जन्मणाऱ्या प्रत्येक पदार्थाला नाश असतो हे आदिम मानवाचे निरीक्षण प्रलयकथांमधून व्यक्त होत असते. सूर्य उगवतो, मावळतो आणि पुन्हा उगवतो या कालचक्राचा अनुभव प्राचीन मानवाने प्रलयकथांद्वारे व्यक्त केला असेल असे काहींना वाटते.

प्रलयकथांचा आणखी एक लक्षणीय विशेष आहे. या कथांमध्ये नवीन जग निर्माण करणारी व्यक्ती दैवी कृपेने वाचते. नोआची कथा बायबल मध्ये येते. त्यामध्ये नौका तयार करण्याची सूचना सज्जन नोआला देव देतो. त्यामुळेच नोआ आणि त्याचे कुटुम्बीय बचावतात. मनु-मत्स्यकथेमध्ये इतर दुर्जन बुडून मेले आणि सज्जन मनु तेवढा वाचला असा पुसटसा सुद्धा उल्लेख नाही.

मनूने माशाला वाचवले आणि उपकाराची परतफेड म्हणून माशाने मनूचा जीव वाचवला ही संकल्पना फक्त या प्रलयकथेमध्ये येते. प्रस्तुत कथेमध्ये प्रलयकथेची सांगड अवतारकथेशी घातलेली दिसते. पुराणवाङ्मयामध्ये विकसित झालेल्या अवतारकथांची बीजे वैदिकवाङ्मयात आढळतात. अनिष्ट संततीमध्ये खचत चाललेल्या पृथ्वीला वाचवण्यासाठी परमेश्वर अनुरूप अवतार घेतो. यापैकी मत्स्यावताराचे बीज मनु-मत्स्य कथेमध्ये दिसते.

मनुमत्स्यकथा शतपथ ब्राह्मणात विकसित झालेली दिसते. मनूचा उल्लेख ऋग्वेदात सुमारे वीस वेळा आला आहे. तो मानवजातीचा पिता आहे, यज्ञ आणि तदनुषंगिक विषयांचा मार्गदर्शक आहे, आणि त्याने यज्ञरूपी मार्ग शोधून काढला आहे, इ. उल्लेख आढळतात. परंतु, शतपथ ब्राह्मणात ही कथा अधिक विकसित झालेली दिसते. शतपथ ब्राह्मणातल्या कथेतले कच्चे दुवे महाभारताने अधिक विकसित केले (आरण्यकपर्व ३.१८५).

मनवे ह वै प्रातः अवनेग्यमुदकमाजह्रुर्यथेदं पाणिभ्यामवनेजनायाहरन्त्येवं तस्यावनेनिजानस्य मत्स्यः पाणी आपेदे ।।१ ।।

स हास्मै वाचमुवाद। बिभृहि मा पारयिष्यामि त्वेति। कस्मान्मा पारयिष्यसीति। औघः इमाः सर्वाः प्रजा निर्वोढा ततस्त्वा पारयितास्मीति। कथं ते भृतिरिति ।।२ ।।

स होवाच यावद्वै क्षुल्लका भवामो बह्वी वै नस्तावन्नाष्ट्रा भवति। उत मत्स्य एव मत्स्यं गिलति। कुम्भ्यां माऽग्रे बिभरासि। स यदा तामतिवर्धा अथ कर्षूं खात्वा तस्यां मा बिभरासि। स यदा तामतिवर्धा अथ मा समुद्रमभ्यवहरासि। तर्हि वा अतिनाष्ट्रो भवितास्मि इति ।।३ ।।

शश्वद्ध झष आस। स हि ज्येष्ठं वर्धते। अथेतिथीं समां तदौघ आगन्ता। तन्मा नावमुपकल्प्योपासासै। स औघ उत्थिते नावमापद्यासै। ततस्त्वा पारयितास्मि इति ।।४ ।।

तमेव भूत्वा समुद्रमभ्यवजहार। स यतिथीं तत्समां परिदिदेश ततिथीं समां नावमुपकल्प्योपासां चक्रे स ओघ उत्थिते नावमापेदे तं स मत्स्य उपन्यापुप्लवे। तस्य शृङ्गे नावः पाशं प्रतिमुमोच तेनैतमुत्तरं गिरिमतिदुद्राव ।।५ ।।

स होवाच अपीपरं वै त्वा। वृक्षे नावं प्रतिबन्धीष्व। तं तु त्वा मा गिरौ सन्तमुदकमन्तश्छैत्सीद्यावदुदकं समवायात् तावत्तावदन्ववसर्पासीति ।।६ ।।

स ह तावत्तावदेवान्ववससर्प तदप्येतदुत्तरस्य गिरेर्मनोरवसर्पणमिति। औघो ह ताः सर्वाः प्रजा निरुवाह अथेह मनुरेवैकः परिशिशिषे ।।७ ।।

टीपा –

अवनेग्य – अव + निज्. विध्यर्थी कर्मणि धा.वि. धुण्यास योग्य.

अवनेनिजान – अव + निज् व.का.धा.वि. धुणारा.

पाणी + आपेदे – पाणीमधला द्विवचनाचा 'ई' प्रगृह्य असल्यामुळे संधी झाला नाही.

उवाद – वद् १ प. परोक्ष. तृ.पु.ए.व. अभिजातमध्ये आढळत नाही.

स हास्मै वाचमुवाद – ज्याच्याशी बोलायचे त्याची चतुर्थी जे बोलायचे त्याची द्वितीया.

औघ – (पुं.) पूर.

यावद्वै क्षुल्लका भवामो ... – मात्स्यन्यायाचा प्राचीन उल्लेख. लहान माशांना मोठे मासे गिळंकृत करतात. (मत्स्य एव मत्स्यं गिलति) "बळी तो कान पिळी". शतपथात उल्लेखिलेला हा न्याय महाभारतात अधिक स्पष्टपणे आलेला दिसतो.

दुर्बलं बलवन्तो हि मत्स्याः मत्स्यं विशेषतः ।

भक्षयन्ति सदा वृत्तिर्विहिता नः सनातनी ॥

मात्स्यन्यायाचा उल्लेख कौटिलीय अर्थशास्त्र, कामन्दकीय नीतिसार इ. ग्रंथांमध्येही येतो. दण्डधारी राजा नसेल तर अराजक माजते आणि मात्स्यन्यायाने प्रजा वागते. म्हणून दण्डधारी राजाची आवश्यकता असते. कामन्दकीय नीतिसार सांगते-

परस्परामिषतया जगतो भिन्नवर्त्मनः ।

दण्डाभावे परिध्वंसी मात्स्यन्यायः प्रवर्तते ॥

अराजकाः प्रजाः पूर्वं विनेशुरिति नः श्रुतम् ।

परस्परं भक्षयन्तो मत्स्या इव जले कृशान् ॥

नाष्ट्रा भवति – नासाडी होते.

कर्षू – खड्डा.

अतिवर्धै – अति + वृध् वृद्धिंगत होणे. प्रार्थनार्थ प्र.पु.ए.व. प्रार्थनार्थ (लेट् subjunctive) मध्ये वक्त्याची इच्छा किंवा क्रिया घडण्याची शक्यता वर्तवली जाते.

भाषा बोलीभाषा असल्यामुळे लिङ्गव्यत्यय, पुरुषव्यत्ययासारखे नैसर्गिक दोष दिसतात. स यदा तामतिवर्धै तदा माम् ... (तो जेव्हा त्या खड्ड्यात मोठा होईल तेव्हा तेव्हा मला ...) यामध्ये प्रथम पु. एकवचनासाठीच तृ.पु.ए.व. वापरलेले दिसते.

अभ्यवहरासि – अभि + अव + हृ (पाण्यात) सोडणे.

भवितास्मि – भू १ प.प. प्रथम भविष्य प्र.पु.ए.व.

शश्वत् – लगेचच, झपाझप. हरिस्वामी भाष्य – शश्वच्छब्दोऽत्र सामर्थ्यात् क्षिप्रवचनः ।

झष – (पुं.) महामत्स्य, काहीच्या मते शिंग असलेला मासा.

इतिथिं समां – वर्षातल्या ज्यादिवशी.

उपासासै – उप + आस् प्रार्थनार्थ द्वि.पु.ए.व. (माझ्या) जवळ ये.

आपद्यासै – आ + पद् प्रार्थनार्थ द्वि.पु.ए.व. (चढ)

पारयितास्मि – प्रथम भविष्य प्र.पु.ए.व.

उपासांचक्रे – उप + आस्, आम् युक्त, परोक्ष भू.का. तृ.पु.ए.व.

उपन्यापुप्लवे – उप + नि + आ + प्लु परोक्ष भू. तृ.पु.ए.व.

प्रति + मुच् – बांधणे.

उत्तर–गिरिः – हिमालय.

अतिदुद्राव – अति + द्रु. लगबगीने गेला.

अपीपरम् – पृ प्रयो. तृतीय भू.का. प्र.पु.ए.व.

मा ... अन्तश्छैत्सीत् – तुला पाण्याने तोडू नये. जसजशी पाण्याची पातळी खाली येईल तसतसा तू उतर.

सम् + अव + ई – ओसरणे.

अनु + अव + सृप् – खाली उतर, प्रार्थनार्थ द्विपु. ए.व.

"मनोरवसर्पण" हे नाव शतपथात येते. अथर्ववेदात नावप्रभंशन असे हिमालयाच्या शिखराचे नाव येते. महाभारतात "नौबन्धन" या नावाचा उल्लेख येतो.

*****